**जिल्हा परिषदेमधील शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये उपविभागीय अभियंता / उपविभागीय अधिकारी या पदावर निवडीने नेमणूक देण्यासाठी राखून ठेवलेल्या पदांच्या वाटपाचे (Quota) पुनर्विलोकन**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय , क्र. ग्रापापु-१००३/प्र.क्र.-२६७/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २८ सप्टेंबर, २००५**

पहा:- शासन निर्णय, पा.पु. व स्व.वि. क्रमांक: ग्रापापु-१०९७/प्र.क्र.४१/पापु-०७, दिनांक ३ डिसेंबर, १९९८

**शासन निर्णयः-**

प्रस्तावनेतील दिनांक ३ डिसेंबर, १९९८ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदांमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग / उपविभाग कार्यरत जिल्हा तांत्रिक सेवा - (वर्ग-३) (अभियांत्रिकी) मधील कनिष्ठ अभियंते व जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-२) (अभियांत्रिकी) मधील शाखा अभियंते यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील उपविभागीय अधिकारी व उपविभागीय अभियंता या पदावर निवडीने नेमणूक करण्यासाठी राखून ठेवावयाच्या पदांच्या वाटपाचे (Quota) गुणोत्तर ठरवून देण्यात आले असून जिल्हा परिषदांमध्ये व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये या संवर्गात सध्या मंजूर असलेली पदसंख्या विचारात घेऊन सदर गुणोत्तरानुसार जिल्हा परिषदेमधील शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये उपविभागीय अभियंता / उपविभागीय अधिकारी पदी नेमणूक देण्यासाठी, या संवर्गात १२७ पद संख्या निश्चित करण्यात येत आहे.

२. या निश्चित केलेल्या पदसंख्येपैकी उपविभागीय अभियंता (पदवीधर) यांच्यासाठी ६३ पदे व उपविभागीय अधिकारी (पदविकाधारक) यांच्यासाठी ६४ पदे राखून ठेवण्यात येत आहेत.

३. उपविभागीय अभियंता (पदवीधर) यांच्यासाठी वरीलप्रमाणे राखून ठेवलेल्या पदांवर निवडीने नेमणूक देण्यासाठी पुरेशा संख्येचे पदवीधर अभियंते जिल्हा परिषदेकडे उपलब्ध होत नसतील तर, त्यांच्या जागा पदविकाधारकांच्या निवडीने नियुक्तीसाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात. मात्र, या निवडीने नियुक्त्या अभावित (Fortuitous) राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव.
१) मा. राज्यमंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव.
२) मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
३) मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
५) उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) निवडनस्ती (पापु-०७)